# डोळे येतात तेव्हा_



सखूच्या आईचे डोळे लाल झाले आहेत.
डोळ्यातून सारखे पाणी येत आहे.
तिच्या डोळ्यांना खाज येते.
डोळे चोळले की लाल होतात. डोळ्यांची
आग होते. आईच्या डोळ्यांचे दुखणे
वाढतेच आहे. तिला चुलीजवळ
बसवत नाही. सखूच आता स्वयंपाक
करते.



© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई-४०० ००५.
प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे-४११ ०२९.

शेजारच्या बाईंनी सखूच्या आईला झाडपाल्याचे औषध सांगितले. एका झाडाच्या बिया वाटून ती पूड डोळ्यात घालायला सांगितली. पण सखूच्या आईने नानाला डोळे दाखवले.



नाना म्हणाला, "तुम्ही डोळ्यात कसलीतरी पूड घातली नाही हे चांगले केले. डोळा नाजूक असतो. त्यात बारीक कण गेला तरी इजा होते. तुमचे डोळे आले आहेत. घाबरू नका. तुम्ही दवाखान्यात जा. डॉक्टर डोळ्यात घालायचे औषध देतील. ते डोळ्यात घाला."

ही मुलगी पहा. तिचे डोळे आले तेव्हा भलतेसलते औषध डोळ्यात घातले. डोळे सुजले. दुखणे वाढले.

डोळ्यांशी असा खेळ खेळू नका. डोळे आले की दवाखान्यात जा.

डोळे पुसण्यासाठी स्वच्छ मऊ फडके जवळ ठेवा. डोळे खसाखसा चोळू नका. एकदा वापरलेले फडके घरातल्या इतरांना देऊ नका. ते वापरले तर त्यांचेसुध्दा डोळे येतील. लहान मुले आईच्या अंगावर खेळतात. मुलाने तुमच्या पदराला तोंड पुसले तर तुमच्या डोळ्यातले जंतू त्याच्या डोळ्यात जातील. त्याचेसुध्दा डोळे येतील. पदराऐवजी ह्या फडक्यांनीच डोळे टिपा.



सखूने मऊ फडकी साबण लावून स्वच्छ धुतली. उन्हात सुकवली. डोळे पुसायला हीच फडकी आईला दिली.

सखूच्या आईने दवाखान्यातून औषध आणले. सखूने आईच्या डोळ्यात औषधाचे थेंब घातले. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी नेमाने औषध घातले. आई डोळे मिटून निजून राहिली. डोळ्यांना आराम वाटला. सखूच्या आईचे डोळे बरे झाले.

